# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

ISO 9001 : 2008 मानांकित कार्यालय

**दूरध्वनी 07252-233653 फॅक्स 07252-232858**

**ईमेल : rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://washim.nic.in**


क्र.कक्ष.२१/अका/आस्था/कावि-७२८ /२०१६ दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६

## जाहिर ई निविदा सुचना

वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयाकरीता खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करण्यासाठी इच्छुक निविदा धारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Model | Description | Qty |
|---|---|---|---|
| 1 | CCTV I.R. DOME Camera 700TVL | 3 MEGA PIXEL, HIGH SPEED, FULL HD, 8 MM, FIXEL<br>LANE 50 MTR HIKVISION | 5 |
| 2 | DVR | 4 Channel, D.V.R. HIKVISION | 1 |
| 3 | CABLE FOR INSTALLATION OF CCTV | As Per Requirement | |
| 4 | LED TV (SONY) | SONY (50 INCH) LED SMART TV | 1 |
| 5 | GENERATER | 15 KV 23 BHP CUMMINS COMPANY | 1 |
| 6 | BIOMETRICS MACHINE | CELULAR /WI-FI FACILITY DATA MININ | 2 |

अधिक माहितीकरीता सदर ई-निविदा सुचना बाबतची माहिती www.mahatenders.gov.in व www.washim.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वा/-

**जिल्हाधिकारी वाशिम**

**जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम**

ISO 9001 : 2008 मानांकित कार्यालय

**दूरध्वनी 07252-233653 फॅक्स 07252-232858**

**ईमेल : rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://washim.nic.in**

---

# ई-निविदा सन 2016-17 अटी व शर्ती

1. रु.3000/- ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यानंतर www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने ई निविदा फॉर्म मिळेल. सदर रक्कम परत मिळणार नाही.
2. निविदा दोन संच लिफाफा पध्दतीने भरावी लागेल. त्यापैकी लिफाफा क्र.1 तांत्रिक बाबीचा असून त्यातील आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या निविदाधारकाचे बाबतीत दराबाबतचा लिफाफा क्र.2 उघडण्यात येईल. लिफाफा क्र.1 तांत्रिक लिफाफयातील बाबीची पूर्तता न करणाऱ्या निविदाधारकांच्या दराबाबतचा लिफाफा क्र.2 उघडण्यात येणार नाही.
3. तांत्रिक लिफाफा क्र.1 मधील खालील बाबीसंबंधित पूर्ण माहिती कागदपत्रांसह सादर करावी.
   1. रु.3000/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) प्रति निविदेची किंमत असेल व ती ऑनलाईन पध्दतीने भरावी. त्याबाबतची पावती स्कॅन करुन अपलोड करावी.
   2. रु.50,000/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी व त्याबाबतची पावती स्कॅन करुन अपलोड करावी.
   3. आयकर भरल्याबाबतचे अद्यावत प्रमाणपत्र व भागीदारी संस्थेच्या बाबतीत प्रत्येक भागीदाराने आयकर भरल्याबाबत अद्यावत प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी अपलोड करावी.
   4. भागीदारी संस्था असल्यास सहायक निबंधक भागीदारी संस्था यांचेकडे नोंदणी केल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निविदा भरणारी संस्था सहकारी संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, उपविधी (बायलॉज) तसेच संस्थेकडे उपलब्ध खेळते भांडवल संबंधित संस्थेच्या बँक पासबूकाची सांक्षाकीत प्रत व संस्थेच्या मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल इत्यादीची स्कॅन कॉपी अपलोड करावी.
   5. निविदा धारकाने दयावयाचे प्रमाणपत्र "लिफाफा क्र.1 मधील सर्व कागदपत्रे परिपूर्ण नसतील तर लिफाफा क्र.2 उघडण्यात येणार नाही. म्हणजेच ई निविदा नांमंजूर करण्यात येईल. याची मला जाणिव असून हे मला मान्य आहे" सदर प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी अपलोड करावी.
   6. जे दरपत्रक निविदा धारक संस्था / एंजसीने सादर केले असेल त्यावर सर्व भागीदारांनी किंवा जर कोणी भागीदार गैरहजर असेल तर त्या ज्या व्यक्ती कायदेशिर मुक्त्यारपत्रधारक असतील अशा व्यक्तींनी सहमती देणे आवश्यक आहे. तसेच भागीदारी संस्था ही नोंदणीकृत असल्याबाबत सहायक निबंधक भागीदारी संस्था यांची नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत अपलोड करावी.
   7. अनामत रक्कम भरण्यापासून ज्यांना सूट असेल त्यांनी सूट असल्याबाबत आवश्यक कागदपत्रांची स्कॅनकॉपी अपलोड करावी अन्यथा संबंधितास अपात्र ठरविण्यात येईल.
4. निविदाधारकाने लिफाफा क्र.2मध्ये ऑनलाईन पध्दतीने दरपत्रकाच्या विहित नमुन्यातच दर नमूद करणे आवश्यक आहे.
5. लिफाफा क्र.1 मधील दरपत्रकात नमूद दोन्ही बाबींसाठी स्वतंत्रणे दर नमूद करावे लागतील. त्या निविदाधारकाचा ज्या बाबीसाठी कमी दर नमूद केला असेल त्याचा दर स्विकारण्यात येईल अथवा याबाबत शासनाला फायदेशिर ठरणारा दर स्विकारण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल.

# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम

ISO 9001 : 2008 मानांकित कार्यालय

**दूरध्वनी 07252-233653 फॅक्स 07252-232858**

**ईमेल : rdc_washim@rediffmail.com वेबसाईट http://washim.nic.in**


6. दोन किंवा दोन पेक्षा जास्त निविदा धारकांनी समान दर नमूद केल्यास व ते न्युनतम असल्यास वाटाघाटी अंती जो निविदाधारक कमी दराने पुरवठा करण्यास तयार होईल त्याची निविदा मंजूर केल्या जाईल. याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल.
7. सदर ई निविदेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल.
8. कोणतीही ईनिविदा पुर्णपणे किंवा त्या निविदेचा काही भाग स्विकारणे अगर नामंजूर करणे याबाबतचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
9. निविदाधारकास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमांन्वये शिक्षा झाली असल्यास अथवा काळ्या यादीत टाकल्याचे घोषीत केले असल्यास किंवा याबाबत कार्यवाही सुरु असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत: किंवा त्यांचे नातेवाईकांच्या नावाने निविदा भरु नये अशा निविदा धारकांना देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहिल.
10. निविदा मंजूर झाल्यानंतर निविदाधारकाने तीन दिवसात स्वत:चा पासपोर्ट फोटो साक्षांकित करुन 100 रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.
11. निविदाधारकास कार्यारंभ आदेश मिळाल्याच्या तारखेपासून 07 दिवसात उक्त साहित्याचा पुरवठा लागेल.
12. निविदाधारकास अदा करण्यात येणाऱ्या देयकातून शासन नियमानुसार आयकर व त्यावरील सरचार्ज, व्हॅट, सेलटॅक्स इत्यादी करांची कपात करण्यात येईल.
13. निविदा उघडण्याची प्रक्रिया सुरु असतेवेळी निविदा धारकाने दाखल केलेली ई निविदा काही कारणास्तव उघडण्यात येवू नये अशी विनंती अथवा लेखी अर्ज सादर केल्यास संबंधित निविदाधारकाने निविदेसोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच निविदा अस्विकृत करुन कार्यालयात जमा करण्यात येईल.
14. निविदाधारकाने करारनाम्यातील कोणत्याही अटीचा भंग केल्यास त्याची पूर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
15. निविदा अंतीम झालेल्या निविदाधारक संस्था/एंजसी यांना सदर साहित्य पुरवठा करण्यासाठी अग्रीम दिले जाणार नाही.
16. निविदा अंतीम झालेल्या निविदाधारक संस्था/एंजसी यांनी साहित्याचा पुरवठा पूर्ण झाल्याखेरीज देयक अदा केले जाणार नाही.
17. वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा तसेच काही नविन अटी व शर्ती समाविष्ट करण्याचा अथवा शिथील करण्याचा तसेच कोणतेही कारण न देता एकतर्फी निविदा नामंजूर करण्याचा व करारनामा संपूष्टात आणण्याचा अधिकार जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे. तो निविदाधारक संस्था/एजंसी यांना बंधनकारक असेल. काही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी वाशिम यांचा निर्णय अंतिम राहील.
18. सदर निविदेबाबत निविदाधारक न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही वाशिम जिल्हा मर्यादीत असेल.

***